● शुक्रवार, दि. २९ नोव्हेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १२१ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जगद्‌हर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# शपथविधीचा मुहूर्त ठरला? मुख्यमंत्रिपदाबाबत सस्पेन्स कायम!



मुंबई - विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर आणि अनेक राजकीय घडामोडींनंतर अखेर म हायुतीच्या शपथविधी कार्यक्रमाला मुहूर्त सापडला आहे. २ डिसेंबरला शपथविधी होणार असून गृहमंत्रालय देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तर अर्थमंत्री अजित पवार यांच्याकडेच राहणार असल्याची सूत्रांची माहिती आहे. मुख्यमंत्रिपदाबाबत मात्र अद्याप सस्पेन्स कायम आहे. शुक्रवार (दि २९) रोजी रात्री उशिरापर्यंत दिल्लीत अमित शहा यांच्या उपस्थिती देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, अजित पवार यांची बैठक होणार आहे. या बैठकीनंतर राज्यातील मुख्यमंत्री ठरणार असल्याची माहिती मिळत आहे.

एकनाथ शिंदे यांनी ठाण्यातील निवास्थानी पत्रकार परिषद घेऊन, सरकार स्थापन करण्यात आपला कोणताही अडसर नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा जो निर्णय घेतील तो आपल्याला मान्य आहे. उपमुख्यमंत्रिपदाबाबतही जो निर्णय घेतील तो आपल्याला म ान्य असल्याचं म्हटलं होतं. त्यामुळे मुख्यमंत्रिपद आणि सरकार स्थापनेचा मार्ग मोकळा झाला होता.

दरम्यान एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला केंद्रातही ऑफर अशल्याची माहिती आहे. केंद्रात प्रत्येकी एक मंत्रिपद मिळण्याची शक्यता आहे. दरम्यान अजित पवार याच्या राष्ट्रवादी काँग्रेसने म हाच्या नव्या सरकारमध्ये ९ कॅबिनेट आणि ३ राज्यमंत्रिपदाची मागणी केली आहे. त्यामुळे राष्ट्रवादीच्या विद्यमान मंत्र्यांपैकी ७ जणांना पुन्हा संधी मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तसंच राष्ट्रवादी काँग्रेसकडून यावेळी युवा चेहऱ्यांना संधी दिली जाऊ शकते, अशी सूत्रांची माहिती आहे.

एकनाथ शिंदे यांनी केंद्रात मंत्रिपदाची ऑफर देण्यात येणार आली आहे. तर श्रीकांत शिंदे यांना उपमुख्यमंत्रिपद देण्यात येणार असल्याच्याही चर्चा आहेत. दरम्यान कोणत्या पक्षाला कोणती खाती आणि कोणत्या नेत्याला म हत्त्वाचं मंत्रिपद देण्यात येणार याचा चेहरा ठरला तर पुढची रणनिती ठरवताना महायुतीला सोपं जाणार आहे. शिवाय येत्या काळात म हाराष्ट्रात महानगरपालिका आणि नगरपालिकांच्या निवडणुका आहेत. त्यामुळे या निवडणुकामध्ये युती राखण्यासाठीही मंत्रिपदाचं महायुतीत योग्य वाटप महत्त्वाचं असणार आहे. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांचा शपथविधी सोहळा २ डिसेंबर रोजी होण्याची शक्यता वर्तवली जातेय. शपथविधी सोहळ्यात काही मान्यवर अणि धार्मिक संतांचाही समावेश असणार आहे, अशी चर्चा आहे. दरम्यान, मुख्यमंत्रिपदाचे दावेदार मानले जाणारे एकनाथ शिंदे यांनी ते शर्यतीतून बाहेर पडल्याचं जाहीर केलं आहे. सरकार स्थापनेच्या तयारीत असतानाच एकनाथ शिंदे यांनी त्यांचा मुलगा श्रीकांत शिंदे यांना नव्यानं स्थापन होणाऱ्या मंत्रिमंडळात उपमुख्यमंत्री म्हणून नियुक्त करावे, अशी विनंती केल्याचीही चर्चा आहे.

जर मुख्यमंत्रिपद नाही मिळालं तर महायुती सरकारचा निमंत्रक म्हणून जबाबदारी द्यावी. शिवाय खासदार श्रीकांत शिंदे यांना नव्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्रिपद द्यावे असा प्रस्ताव एकनाथ शिंदे यांनी भाजपाच्या वरिष्ठांकडे ठेवला आहे, अशी सूत्रांची माहिती आहे. त्यामुळे २ डिसेंबरपर्यंत राज्यात आणखी कोणत्या राजकीय घडामोडी घडतात. कोणाच्या गळ्यात मुख्यमंत्रिपदाची माळ पडते, कोणाला महत्त्वाची खाती मिळतात, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

## सेवानिवृत्त पोलीसाची हत्त्या

**सिंधुदुर्ग -** दोन महिन्यापूर्वी स्वेच्छानिवृत्ती घेऊन सध्या काही कामानिमित्त गावी आलेले कणकवली तालुक्यातील देवगड निपाणी राज्यमार्गालगत कोळोशी वरचीवाडी येथील व मुंबई पोलीस दलात सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदावर स्वेच्छानिवृत्ती घेतलेले विनोद मधूकर आचरेकर (वय ५५) यांचा राहत्या घरात निर्घृणपणे खून करण्यात आला आहे. त्यांच्या समवेत घरात असलेल्या संशयीत आरोपी सिध्दीविनायक उर्फ पप्पू संजय पेडणेकर (वय २४ , रा. कोळोशी वरचीवाडी) याने डोक्यात कुदळ मारुन विनोद आचरेकर यांचा खुन **पान ३ वर**

## निवडणुकीत मतदारांचा टक्का अचानक कसा वाढला - पटोले

**नागपूर -** विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला बहुमत मिळालं तर महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला. महायुतीला बहुमत मिळाल्यानंतर राज्यात महायुतीचं सरकार लवकरच स्थापन होईल. सध्या सरकार स्थापनेच्या हालचाली सुरु आहेत. मात्र, असं असतानाच महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून मतमोजणीसंदर्भात अनेक प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत. तसेच या निवडणुकीत मतदारांचा टक्का कसा वाढला? याबाबतही काही नेत्यांनी शंका उपस्थित केल्या आहेत. यावर आता काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीही पत्रकार परिषद घेत भाष्य केलं आहे.

तसेच निवडणूक आयोगाला काही सवाल करत गंभीर आरोप देखील केले आहेत. मतदानाच्या टक्केवारीत तफावत असल्याचं दिसत असून याविरोधात आम्ही न्यायालयात जाणार आहोत, तसेच रात्री उशीरापर्यंत कोणत्या मतदान केंद्रावर मतदान सुरु होतं? हे निवडणूक आयोगाने सांगावं? राज्यात किती वाजेपर्यंत मतदान सुरु होतं? याचे फुटेज आम्हाला मिळायला हवे. ७६ लाख मतदानाची वाढ कशी झाली?, असे अनेक सवाल नाना पटोले यांनी उपस्थित केले आहेत.



कोणतीही निवडणूक झाल्यानंतर निवडणूक आयोग पत्रकार परिषद घेऊन जनतेला माहिती देत असतं. अशा प्रकारची परंपरा आतापर्यंत राहिली आहे. मात्र, महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक झाल्यानंतर निवडणूक आयोगाने कोणतीही पत्रकार परिषद घेतली नाही. महाराष्ट्रात झालेल्या मतदानाच्या टक्केवारीत फरक जाणवतो आहे. जवळपास ७६ लाख मतदान वाढलं आहे. मग मतदानाची ही वाढ कशी झाली? आता आम्हाला जे सांगितलं जातं की रात्री साडेअकरा वाजेपर्यंत मतदान झालं. मग कमीत कमी दोन ते तीन किलोमिटरच्या मतदारांच्या रांगा असतील. मग निवडणुका पारदर्शक घेण्यासाठी निवडणूक आयोग फोटो, व्हिडीओ वैगेरे काढत असतं. मग निवडणूक आयोगाने आम्हाला रात्री म तदारांच्या रांगा लागल्या होत्या की नाही, म्हणजे संध्याकाळपर्यंत मतदानाची आकडेवारी ५८.२२ टक्के होत असेल तर मग असं काय झालं की रात्री साडेअकरा वाजेपर्यंत मतदान झालं?, असा सवाल नाना पटोले यांनी उपस्थित केला.

मतदानाच प्रमाण कसं वाढलं? मतदान जवळपास ७.५ टक्क्यांनी वाढलं. मग याचं उत्तर आम्हाला निवडणूक आयोगाने द्यावं. राज्यात मतदानाचा टक्का जो वाढला आहे त्याबाबत गंभीर प्रश्न लोकांकडून उपस्थित केले जात आहेत. स्वत: केंद्रीय अर्थमंत्री सीतारामन यांचे पती त्यांनी देखील याबाबत प्रश्न उपस्थित केले आहेत. मी जे प्रश्न उपस्थित केले ते त्यांनी देखील उपस्थित केले. त्यामुळे निवडणूक आयोगाच्या पारदर्शकतेबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत. निवडणूक आयोगाने याचं उत्तर दिलं पाहिजे. तसेच सायंकाळी साडेपाच वाजता **पान ३ वर**

युवा आदर्श

### जागा ...

जिंकलो जेंव्हा मागे
उरली दोन बोटे स्वर्गा
उत्साहे केला कल्ला
करारा कापला मुर्गा
ऐश करे सत्तास्थानी
मस्तीत धुंदीत झिंगा
विजयश्री हार घेऊन
भोवताल घाले पिंगा
पराजीत आता होता
उसळला उद्रेकी दंगा
अहंकार झाला जागा
आमच्याशी घेता पंगा
अकस्मात अविश्वास
लाहीलाही होई अंगा
पैलवान नवखा जरी
हरवले सहज दबंगा
फुलातचं असेल दोष
गोंगावी संशयी भुंगा
अन्याय झाला झाला
वाजवू लागले भोंगा
अस्मानाशी पैज लावे
कापून टाकले पतंगा
खुज्या मनोवृत्ती अशा
ग्रासून सोडले उत्तुंगा
पराजय सन्माने भोगा
उद्या मिळे सत्ता जागा
सत्संगाशी संग करता
दिल्या वचनाले जागा

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## राज्यस्तरीय शालेय सेपाक टाकरा स्पर्धेत जालना जिल्ह्या दुसऱ्या स्थानावर

### मोहीत मोरेची राज्य संघात निवड

**जालना । प्रतिनिधी -** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य व जळगांव जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या वतीने आयोजीत १७ वर्षाआतील मुलांच्या राज्यस्तरीय शालेय सेपाक टाकरा स्पर्धेत चुरशीच्या लढतीत जालना जिल्हा संघ दुसर्या स्थानावर राहीला, तर प्रथम क्रंमाकावर नागपुर जिल्हा राहीला.

शालेय राज्यस्तरीय सेपाक स्पर्धेत जालना जिल्हा दुसर्या संघावर राहण्याची हि पहीलीच वेळ आहे, जिल्हा संघटनेचे सचिव शेख चाँद पी.जे. यांच्या मार्गदर्शनाखाली संघाचे प्रशिक्षक अमोल काटकर यांच्या अथक प्रयत्नाने जिल्हा संघाने हे दैदिप्यमान यश प्राप्त केले आहे.

जालना जिल्हा संघात ऋषी विद्या एज्युकेशनल स्कुलचे खेळाडु मोहीत मोरे, विराज शेजुळ, प्रणव राठोड, समर्थ खुरपे, रूद्रवीर बागल यांचा समावेश आहे, यापैकी मोहीत मोरे याची



मणीपुर येथे होणार्या राष्ट्रीय शालेय सेपाक टाकरा स्पर्धेत महाराष्ट्र राज्य संघात निवड झालेली आहे. संघाच्या यशाबद्दल व मोहीत मोरे याची राज्य संघात निवड झाल्याबद्दल जालना जिल्हा सेपाक टाकरा असोसिएशनचे अध्यक्ष शेख इब्राहीम, सचिव शेख चाँद पी.जे., असोसिएशनचे सर्व पदाधिकारी तसेच ऋषी विद्या एज्युकेशनल स्कुलच्या एम.डी. शितल भाला, प्रिंसीपल डॉ. हेमा सोनटक्के, हेडमिस्ट्रेस प्रतीमा गोरंट्याल, व्हाईस प्रिंसीपल यशवंत ढोलके, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. तुलजेश भुरेवाल यांनी अभिनंदन केले आहे.

## विद्यार्थ्यांना अपार पीआर आय डी तयार करण्यासाठी मुदतवाढ द्या

### शेख अब्दुल रहीम यांचे राज्याचे प्रकल्प संचालकांना निवेदन

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटन तथा हॅप्पी टू हेल्प फाऊंडेशन चे संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम सर यांनी राज्याचे प्रकल्प संचालक मा. आर विमला यांना निवेदनाद्वारे विनंती केली आहे की यु-डायस प्लस प्रणाली मधून इयत्ता १ली ते १२ वी पर्यंत विद्यार्थ्यांना अपार झठ आय डी तयार करण्यासाठी दिनांक ३० नोव्हेंबर २०२४ पर्यंत अंतिम मुदत देण्यात आली आहे. जवळपास सर्वच शाळांमध्ये अपार आय डी तयार करण्याचे काम हे शिक्षक बांधव युद्ध पातळीवर करीत आहेत. आपले अध्यापन आणि इतर शालेय काम काज सांभाळून हे काम शिक्षक बांधव करीत आहेत. *प्रथम सत्र परीक्षा कामकाज, विधानसभा निवडणुका प्रशिक्षण आणि ड्युटी, प्रथम सत्र उत्तरपत्रिका तपासणी, निकालाचे कामकाज, अध्ययन अध्यापन प्रक्रिया इत्यादी कामकाजात शिक्षक व्यस्त होते व सद्या काही कामात व्यस्त असल्याने आपण दिलेल्या मुदतीत अपार आय डी तयार करण्याचे कामकाज करणे शक्य होणार नाही असे वाटते. तरी वरील सर्व बाबींचा विचार करून आपण झठ आय डी तयार करण्यासाठी पुन्हा एकदा मुदतवाढ देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनाची एक प्रत शालेय शिक्षण आयुक्त मा. सूरज मांढरे साहेब यांना ही देण्यात आली आहे.



### महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त भाजपा जिल्हा जालना च्या वतीने अभिवादन

## क्रांतिसूर्य फुले यांचे कार्य प्रेरणादायी - भास्कर दानवे

**जालना । प्रतिनिधी -** भारताच्या शैक्षणिक क्रांतीचे जनक, थोर समाजसुधारक, क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथी निमित्त भाजपा जालना विधानसभा प्रमुख भास्कर दानवे यांच्याहस्ते भारतीय जनता पार्टी जिल्हा कार्यालय, जालना येथे दि.(२८) रोजी क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी भाजपा जालना विधानसभा प्रमुख भास्कर आबा दानवे म्हणाले की, भारतातील समाजसुधारक, विचारवंत, लेखक, तत्त्वज्ञ आणि क्रांतिकारी कार्यकर्ते म्हणून महात्मा फुले यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. महात्मा ज्योतिबा फुले यांनी 'सत्यशोधक समाज' या संघटनेची स्थापना केली होती, ज्याचा उद्देश समाजातील तळागाळातील लोकांच्या उन्नतीसाठी काम करणे हा होता.

महात्मा फुले यांचे संपूर्ण आयुष्य सामाजिक कार्यात गेले. त्यांनी शेतकरी आणि मजुरांच्या हक्कांसाठीही काम केले. यासोबतच त्यांनी म हिलांसाठी देखील खूप काम केले. मुलींना शिक्षण देणे, बालविवाह थांबवणे अशी कामं त्यांनी केली. ज्योतिबा फुले यांनी पत्नी सावित्रीबाई यांना स्वतः शिकवले आणि त्यांना शिक्षिका बनवले. यानंतर सावित्रीबाईंनी मुलींसाठी सुरू केलेल्या शाळेत शिकवायला सुरुवात केली होती. महात्मा फुले यांचे विचार समाजातील एका मोठ्या वर्गाला प्रेरणा देणारे आणि क्रांती निर्माण करणारे आहे असे त्यांनी याप्रसंगी सांगितले.

यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, सरचिटणीस सिध्दीविनायक मुळे, सोपान पेंढारकर, सिध्देश्वर हसबे, प्रा.राजेंद्र भोसले, राजेश जोशी, डोंगरसिंग साबळे, सय्यद इम्रान, सोमेश काबलिये, शाम उगले, जगदीश येनगुपटला, सागर भानुशाली विठ्ठल नरवडे, शरद आम्ले, गजानन खंडगळे आदीसह भाजपा कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.



## संपादकीय पान

# राज्यातील उमेदवारांनी निवडणूकीचा जाहीर केलेला खर्च हास्यास्पद

राज्यात विधानसभा निवडणुकां मोठ्या थाटात आणि उत्साहात संपन्न झाल्या.या निवडणुकीमध्ये उमेदवारांचा खर्च निवडणुक आयोगाने ठरल्याप्रमाणे करावा लागतो.या निवडणुकीत प्रत्येक उमेदवारांची खर्चाची मर्यादा ४० लाख रुपये निश्चित करण्यात आलेली होती.त्यानुसार प्रत्येक उमेदवारानी आपली आकडेवारी जुळवाजुळव केली व प्रत्येकांनी ४० लाखांच्या आत आपला खर्च निवडणुक अधिकाऱ्यांकडे सादर केला. महाराष्ट्रात १३ करोड लोकसंख्या आहे. विधानसभा निवडणुक कशी झाली व कोणत्या पध्दतीने झाली याची जाण राज्याच्या जनतेला चांगल्याप्रकारे अवगत आहे.त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत नागपूरातील काही उमेदवारांनी निवडणुक काळात जाहीर केलेला खर्च जास्तीत जास्त १५ लाख रुपये पर्यंत दाखविण्यात आलेला आहे. हीच परिस्थिती संपूर्ण महाराष्ट्रातील उमेदवारांचीही असावी यात दुमत नाही.परंतु सध्याच्या काळात विधानसभा निवडणुक खरोखरच १५ लाख किंवा ४० लाखांपर्यंत होने शक्य आहे का?हा सुद्धा मोठा गहन आणि विचार करण्यासारखा प्रश्न आहे.त्यामुळे असे वाटते की उमेदवार निवडणूक अधिकाऱ्यांच्या डोळ्यात धूळ तर झोकत नाही ना! अशी शंकाही निर्माण होते. कारण सध्याच्या परिस्थितीत नागपूरच नाही तर संपूर्ण महाराष्ट्रातील राष्ट्रीय पक्षांचे, क्षेत्रिय पक्षांचे व काही अपक्ष उमेदवारांनी निवडून येण्यासाठी वेगवेगळ्या पध्दतीने छुप्या मार्गाने करोडो रूपयांचा वापर केला ही बाब राज्याच्या १३ कोटी जनतेने आपल्या उघड्या डोळ्यांनी पहाली आहे व ही बाब सर्वांना माहीत सुध्दा आहे.कारण सध्याच्या कोणत्याही निवडणुका असो आपल्याला सर्वच राजकीय पक्षांकडून पैशाचा पाऊस पडतांना दिसतो ही बाब तेवढीच सत्य आहे.परंतु हिशोब जाहीर करतांना मात्र मोठ्या शिताफीने व काटेकोरपणे हीशोब दाखवितात. याला आपण खरोखरच स्वच्छ, इमानदार, विश्वासू उमेदवार म्हणावे काय? आणि निवडून आल्यानंतर लोकप्रतिनिधी म्हणावे काय?हा सुद्धा मोठा प्रश्न उद्भवतो. आपणाला सर्वांनाच ग्यात आहे की दारु शिवाय कोणत्याही निवडणुका होत नाही आणि प्रशासनाने याबद्दल मोठे कठोर पाऊल सुध्दा उचलले आणि मोठी कारवाई सुध्दा केली व संपूर्ण महाराष्ट्रात लाखो रुपयांची दारू सुध्दा पकडली. त्याचबरोबर करोडो रुपये सुध्दा प्रशासनाने पकडले ही मोलाची कामगिरी प्रशासनाने केली. तरीही विधानसभा निवडणुकीत मोठ्या प्रमाणात दारू व पैशांच्या देवाणघेवाणचा वापर छुप्या पद्धतीने मोठ्या प्रमाणात दिसून आला. याला आपण खरोखरच लोकशाही म्हणाल का! यावरून स्पष्ट होते की आजच्या परिस्थितीत सर्वसाधारण व्यक्ती कोणतीही निवडणूक लढुच शकत नाही. त्यामुळे आज सिध्द होते की ज्यांच्याजवळ पैसा आहे त्यांनीच निवडणूक लढवावी ती मग कोणतीही निवडणूक असो.त्यामुळे यापुढे असे म्हणायला हरकत नाही की येणाऱ्या कोणत्याही निवडणुका सर्वसाधारण व्यक्तींच्या रहालेल्या नाहीत.



जय हिंद!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## सिंगल युज प्लास्टिकचा मोठा धोका

एकदा वापरून फेकून देण्याजोग्या ( सिंगल युज ) प्लास्टिकचा वापर सर्रास होताना दिसत आहे. सिंगल युज प्लास्टिक मध्ये प्लास्टिकचे कप, पिशव्या, पॉलिथिन, स्ट्रॉ, पाण्याची बाटली, प्लेट, अन्न पदार्थ ठेवण्यासाठी झाकण्यासाठी वापरण्यात येणारे पॅकिंग कागद, प्लास्टिकचे ग्लास, पत्रावळ्या यांचा समावेश होतो. सहज उपलब्ध होत असल्याने जो तो सिंगल युज प्लास्टिकचा वापर करतो. सहज आणि कमी पैशात उपलब्ध होत असल्याने सिंगल युज प्लास्टिकचा वापर वाढला आहे. आपल्या देशात दरवर्षी लाखो टन सिंगल युज प्लास्टिकचा वापर केला जातो. भविष्यात हा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे. सिंगल युज प्लास्टिकचा कचरा बायोडीग्रेडिबल म्हणजे कंपोस्ट होऊ शकत नाही. सिंगल युज प्लास्टिक जाळूनही नष्ट होत नाही. तो मायक्रो कणांच्या माध्यमातून आस्तित्वात राहतो. सिंगल युज प्लास्टिक जाळण्याचा प्रयत्न केला तर वायू प्रदूषण होते. हा कचरा जमिनीखाली दबला तर पाण्याच्या स्त्रोतांना अडथळा निर्माण करतो. हे सिंगल युज पलिस्टक नदी, विहीर, तलावात टाकले तर जलस्त्रोत खराब होतात. नदीतून वाहून सिंगल युज प्लास्टिक समुद्रात जाऊन साठते. सिंगल युज प्लास्टिकमुळे जलचारांना मोठा धोका निर्माण झाला आहे. सिंगल युज प्लास्टिकचे कण जलचरांच्या पोटात जात असल्याने त्यांचे आस्तीत्वाच धोक्यात आले आहे. सिंगल युज प्लास्टिक नष्ट होत नाही. पाण्यात, जमिनीत मायक्रो कण वर्षानुवर्ष राहतात. सिंगल युज प्लास्टिकमुळे जलप्रदूषणही होते. सिंगल युज प्लास्टिक कचरा कुंडीत टाकला जातो. हा कचरा गुरांकडून खाल्ला जातो. त्यामुळे गुरांना आरोग्याच्या गंभीर समस्या निर्माण होतात. एकूणच सिंगल युज प्लास्टिक मुळे जल, वायू प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. मनुष्यप्राण्यांसह इतर जैवविविधतेला सिंगल युज प्लास्टिकमुळे मोठा धोका निर्माण झाला आहे. सिंगल युज प्लास्टिकमुळे पर्यावरणालाही धोका निर्माण झाला आहे. सिंगल युज प्लास्टिक मानवी आरोग्यासाठी तसेच जैवविविधतेसाठी हानिकारक असल्याने त्याचा वापरावर सरकारकडून टप्पा टप्प्याने निर्बंध लादले जात आहेत. निर्बंधासोबतच सिंगल युज प्लास्टिकचे दुष्परिणाम नागरिकांपर्यंत पोहचिण्यासाठी सरकारने जनजागृती करायला हवी. सरकारने सिंगल युज प्लास्टिकचे दुष्परिणाम लोकांना समजावून सांगायला हवेत. शाळा कॉलेजमधून देखील याबाबत प्रबोधन करायला हवे. प्लास्टिक कचऱ्याचे व्यवस्थापन कारणे आणि सिंगल युज प्लास्टिक वस्तूंचा वापर कमी करणे या दोन्ही विषयी जाणीव जागृती होणे, हे अत्यंत महत्वाचे आहे. सिंगल युज प्लास्टिकमुळे संपूर्ण सजीव सृष्टीलाच धोका निर्माण झाल्याने नागरिकांनीच सिंगल युज प्लास्टिक पासून दूर राहायला हवे. सरकारने सिंगल युज प्लास्टिकवर निर्बंध लादले जात असेल तरी त्याचा वापर कमी होताना दिसत नाही. त्यामुळे या प्लास्टिकचे दुष्परिणाम जाणून घेत नागरिकांनी सिंगल युज प्लास्टिकचा वापर बंद करणे हाच भविष्यात मानवजीवन व जैव विविधता राखण्याचा मार्ग आहे.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# दर्ग्यामध्ये शिवमंदीर ?

राजस्थानमधील अजमेर येथील ख्वाजा मोईनुद्दीन हसन चिश्ती यांच्या दर्ग्यामध्ये शिवमंदिर असल्याचा दावा स्थानिक न्यायालयात करण्यात आला आहे. या दर्ग्याबाबत न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली असून, त्यात अजमेर दर्गा हे एक प्राचीन शिवमंदिर असल्याचा दावा करण्यात आला आहे. या दर्ग्याचा पाया शिवमंदिराच्या अवशेषांवर घातला गेला आहे. या याचिकेवर सुनावणीसाठी न्यायालयाने २० डिसेंबरची मुदत दिली आहे. न्यायालयाने ही याचिका बुधवारी सुनावणीसाठी स्वीकारली आणि तिन्ही पक्षांना नोटीस बजावण्याचे निर्देश दिले. फिर्यादीच्या वकिलाने ही माहिती माध्यमांना दिली. चला तर मग जाणून घेऊया काय आहे हे संपूर्ण प्रकरण?



फिर्यादी विष्णू गुप्ता यांचे वकील योगेश सिरोजा यांनी अजमेर येथे पत्रकारांना सांगितले की, दिवाणी खटल्यांचे न्यायाधीश मनमोहन चंदेल यांच्या न्यायालयात खटल्याची सुनावणी झाली. सिरोजा यांनी सांगितले की, दर्ग्यात शिवमंदिर असल्याचे सांगितले जाते. पूर्वी पूजापाठ होत असे. पूजापाठ पुन्हा सुरू करण्यासाठी सप्टेंबर २०२४ मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता. न्यायालयाने दावा स्वीकारत नोटीस बजावली आहे, त्यांनी सांगितले की, या संदर्भात अजमेर दर्गा समिती, अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालय, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण (एएसआय) कार्यालय-नवी दिल्ली यांना समन्स बजावण्यात आले आहेत.

फिर्यादी विष्णू गुप्ता म्हणाले, आमची मागणी होती की अजमेर दर्ग्याला संकटमोचन महादेव मंदिर म्हणून घोषित करण्यात यावे आणि दर्ग्याची कोणत्याही प्रकारची नोंदणी असेल तर ती रद्द करण्यात यावी. त्याचे सर्वेक्षण डख मार्फत करून तेथे हिंदूंना पूजा करण्याचा अधिकार देण्यात यावा. ते म्हणाले की, आम्ही आमच्या दाव्याच्या कारणाबाबत माननीय न्यायालयाला सांगितले आणि प्रदीर्घ चर्चेनंतर न्यायालयाने सायंकाळी नोटीस बजावली की, न्यायालयात पुढील सुनावणी २० डिसेंबर रोजी होईल आणि त्यानंतर प्रतिवादी त्यांचे जबाब नोंदवतील. त्यांचे जे काही आक्षेप असतील त्यांना आम्ही उत्तर देऊ.

# कापूर तेल केसांसाठी किती फायदेशीर !

पूजा-हवन साहित्या व्यतिरिक्त कापूर आरोग्य आणि सौंदर्यासाठीही खूप फायदेशीर आहे. जर तुम्ही तुमच्या केसांच्या समस्यांमुळे हैराण असाल तर घाबरू नका, तुमच्या मेकअपमध्ये हे समाविष्ट करा, तुमच्या अनेक समस्या दूर होतील. चला तर मग जाणून घेऊया केसांसाठी कापूर तेलाचे फायदे-

कापूर तेल घरीच बनवा : कापूर तेल जरी बाजारात उपलब्ध असले तरी ते अगदी सहज घरी तयार करता येते. ते घरी बनवण्यासाठी खोबरेल तेलात कापूरचे काही तुकडे टाका आणि हवाबंद डब्यात ठेवा. काही वेळाने हे खोबरेल तेल कापूर सार शोषून घेईल आणि हे कापूर तेल तयार आहे.

कापूर तेलाचे जादुई फायदे- केसांना कापूर तेल लावल्याने केस लवकर वाढतात, मजबूत होतात आणि केस गळणेही थांबते. यासाठी दह्यात कापूर तेल मिसळून केसांच्या मुळांना लावा आणि अर्ध्या तासानंतर केस धुवा.

केस गळणे किंवा कोंड्याची समस्या असल्यास कापूर तेलाने मसाज करा. या दोन्ही समस्या दूर होतील आणि केसांची पुन्हा वाढ होण्यासही मदत होईल.

केसांमध्ये कोंड्याची समस्या प्रत्येकाला असते, ज्यामध्ये त्वचा तेलकट आणि चकचकीत राहते. त्यामुळे अशा परिस्थितीत कापूर तेल लावल्याने अँटी-बॅक्टेरियल



आणि अँटी-फंगल गुणधर्म असतात, ज्यामुळे तुमची स्कॅल्प स्वच्छ होते आणि कोंडापासून आराम मिळतो.

कापूर तेल तणाव कमी करण्यासाठी देखील फायदेशीर आहे. ते कपाळावर लावल्याने किंवा केसांना मसाज केल्याने तणाव कमी होतो. त्वचेवर कापूर तेल लावल्याने फोड आणि पुरळ बरे होऊ लागतात. इतकंच नाही तर मुरुम कमी करण्यासोबतच त्यांच्या मुळांवरून जुने डाग आणि डागही नाहीसे होतात.

या लेखात दिलेली माहिती आणि उपाय सामान्य सामान्य माहितीवर आधारित आहे. या माहितीची पूर्णता, विश्वासार्हता आणि अचूकता याबाबत युवा आदर्श व्यवस्थापन कोणतीही हमी देत नाही. अधिक माहितीसाठी संबंधित तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

# श्री संतोषीमातेची कहाणी

एका नगरात एक म्हातारी राहत होती. तिला सात मुलगे आणि सात सुना होत्या. सर्व जण एकत्र राहत होते. सहा जण पैसे मिळवीत असत. सातवा मात्र बेकार होता. म्हातारी आपल्या सहा मुलांना चांगले-चांगले करुन खायला घालायची व उरलेसुरले सातव्याला द्यायची. तो बिचारा गरीब भोळा होता. जे मिळेल ते खायचा. थोड्या दिवसानंतर एक मोठा सण आला. त्या दिवशी सहा भावांचे जेवण झाल्यावर त्यांच्या पानांतील राहिलेल्या उष्ट्या लाडवांच्या कण्यांचा आईने एक लाडू केला आणि तो सातव्याकरिता ठेवला. तो घरी आल्यावर त्याच्या बायकोने त्याला ते सांगितले. तेव्हा तो रागावून घर सोडायला निघाला. तो दरिद्री म्हणून आईनेही 'जा' म्हणून सांगितले. त्याबरोबर कपडे गोळा करून तो बायकोकडे गेला व तिला त्याने आपली अंगठी खूण म्हणून दिली. त्याची बायको त्या वेळी शेणी घालत होती. ती म्हणाली, तुम्हांला द्यायला माझ्याजवळ काहीच नाही. हे शेण आहे असं म्हणून आपला शेणानं भरलेला हात त्याच्या पाठीवर उमटवला. तीच आपल्या प्रिय पत्नीची खूण असे समजून तो निघाला.

मजल दर मजल करीत तो दुसर्या देशातील एका मोठ्या शहरात गेला. तेथे एका व्यापार्याकडे नोकरीला राहिला. रात्रंदिवस नेकीने काम केल्यामुळे मालक त्याच्यावर खूष झाला. अशी बारा वर्षे निघून गेली. मालकाने त्याला भागीदार केले. नंतर मालक त्याच्यावर दुकान सोपवून तीर्थयात्रेला गेला.

इकडे घरी त्याची बायको मात्र फार दुःखी होती. सासू वगैरे तिचा छळ करीत. तिला कोंड्याची भाकरी देत आणि पाणी प्यायला नारळाची करवंटी देत. ती रोज रानात जाऊन लाकडे आणी. घरातील सर्व कामे तीच करीत असे. एक दिवस अशीच ती रानात लाकडे गोळा करण्याकरिता गेली असता तिथे काही स्त्रिया श्रीसंतोषीमातेचे व्रत करीत असलेल्या दिसल्या. ते पाहून तिने विचारले, बायांनो, तुम्ही हे काय करत आहात? ही कोणत्या देवीची पूजा?

ते ऐकून त्यातील एक स्त्री म्हणाली, आम्ही हे श्रीसंतोषीमातेचे व्रत करीत आहोत. हे व्रत केल्याने दुःखदारिद्र्य नाहीसे होते. मनातील चिंता नष्ट होते. घर लक्ष्मीने भरून जाते. नवरा परदेशी गेला असेल तर लवकर परत येतो. कुमारीला मनपसंत नवरा मिळतो. कोर्टात आपल्यासारखा निकाल लागतो. रोग बरे होतात. पैसा आणि आरोग्य मिळते. मनाला शांती मिळते. आवडत्या लोकांच्या भेटी होतात. सर्व प्रकारच्या कामना पूर्ण होतात.

ती म्हणाली, मग हे व्रत कसं करायचे ते मला सांगा. तेव्हा ती म्हणाली, आपल्या ऐपतीप्रमाणे दहा पैसे, पन्नास पैसे, सव्वा रुपया यांचे गूळ व हरभरे आणावेत. दर शुक्रवारी संतोषीदेवीची मनोभावे पूजा आणि प्रार्थना करावी. त्या दिवशी उपास करावा. गूळ व हरभरे प्रसाद म्हणून वाटावा. श्रीसंतोषीमातेची कहाणी ऐकणारा कोणी न भेटल्यास आपणच तुपाने निरांजन लावून कहाणी सांगावी. मनोभावे प्रार्थना करावी. आपले काम सिद्धीस जाईपर्यंत प्रत्येक शुक्रवारी याप्रमाणे श्रीसंतोषीमातेचे व्रत करावे. काम झाले की व्रताचे उद्यापन करावे. चार महिन्यांत श्रीसंतोषीमातेचे आपले मनोरथ पूर्ण करते उद्यापनाचे दिवशी आपल्या शक्तीप्रमाणे सव्वा पटीने रवा, तूप घ्यावे. त्याची खीर करावी. हरभर्याची उसळ करावी. आपल्या घरातील आठ मुलांना जेवण घालावे. आपल्याकडे आठ मुले नसतील तर शेजारचे बोलावून आणून त्यांना जेवायला घालावे. आपल्या शक्तिप्रमाणे दक्षिणा द्यावी. असे उद्यापन करावे. फक्त त्या दिवशी घरातील कोणीही आंबट खाऊ नये. ते ऐकल्यावर तिने नेहमीप्रमाणे लाकडे गोळा केली आणि ती नगरात गेली तिने लाकडे विकली आणि आलेल्या पैशातून तिने दहा पैशांचा गूळ आणि हरभरे घेतले. मनाशी निश्चय करून ती फिरली. वाटेत तिला श्रीसंतोषीमातेचे मंदिर दिसले. आत जाऊन तिने देवीला नमस्कार केला आणि म्हाणाली, माते, मी अबला आहे, अज्ञानी आहे. माझे दुःख दूर कर. मी तुला शरण आले आहे याप्रमाणे तिने चार शुक्रवारी व्रत केले. श्रीसंतोषीमातेला तिची दया आली. तिच्या पतीचे पत्र आले, पैसेही आले. तिला फार आनंद झाला. पण तिचे दीर वैगरे मात्र तिची चेष्टाच करीत होते.

इकडे रात्री तिच्या नवर्याच्या स्वप्नात देवी गेली आणि म्हणाली, मुला इकडे येऊन तुला बारा वर्षे झाली. तुझ्या पत्नीची घरी काय अवस्था झाली असेल, याचा कधी विचार केलास काय? मूर्खा, तू तिला विसरलास. पण ती मात्र तुझ्यासाठी, तू परत यावेस म्हणून हाडांची काडे करीत आहे. ती तुझ्या वाटेकडे डोळे लावून बसली आहे. तो म्हणाल, माते, मला हे सर्व समजते. पण मी काय करणार? मी इकडे परदेशात आहे. इथे देण्याघेण्याचा व्यवहार आहे. तो पुरा झाल्याशिवाय मी घरी परत कसा जाणार?

ते ऐकून देवी म्हणाली, मुला, उद्या सकाळी उठल्यावर तू स्नान कर आणि दुकानात जा. माझी प्रार्थना कर. तुपाचे निरांजन लाव. बघता-बघता दुकानाचे देण्याघेण्याचे व्यवहार पुरे होतील.

देवीच्या स्वप्नातील दृष्टान्ताप्रमाणे त्याने सर्व केले. दुसर्या दिवशी त्याने अंघोळ केली, तुपाचा दिवा लावला. श्रीसंतोषीमातेची प्रार्थना केली आणि तो दुकानात गेला. थोड्याच वेळात देण्याघेण्याचे सर्व व्यवाहार पूण झाले. पैशांच्या थैल्या भरून गेल्या. श्रीसंतोषीमातेची स्तुती करून त्याने रात्री दुकान बंद केले आणि सकाळ आपल्या देशास निघाला. तो आपल्या गावाजवळ आला. त्या दिवशी त्याची पत्नी नेहमीप्रमाणे लाकडे गोळा करण्यासाठी रानात आली होती. वाटेत देवीच्या मंदिरात जात असता तिला दुरून येणारे धुळीचे लोट दिसले. तिने देवीला विचारले, माते कोण येत आहे?

देवी म्हणाली, मुली, तुझा नवरा येत आहे. आता मी सांगते तसे कर. जवळच्या लाकडाच्या तीन मोळ्या कर. एक माझ्या मंदिराजवळ ठेव. दुसरी नदीकिनार्यावर ठेव आणि तिसरी आपल्या डोक्यावर घे. तुझ्या डोक्यावरची मोळी पाहून तुझ्या नवर्याला जेवणाची आठवण होईल. तो तुझ्याकडून ती मोळी विकत घेईल, जेवण करील व मग पुढे घरी जाईल. मग तू माझ्या मंदिराजवळची मोळी घेऊन घरी जा आणि अंगणात मोळी टाकून मोठ्याने म्हण सासूबाई, सासूबाई लाकडे घ्या आणि मला कोंड्याची भाकरी द्या. करवंटीत पाणी द्या. पण आज घरी पाहुणे कोण आलेत? देवीच्या सांगण्याप्रमाणे तिने केले. इतक्यात तिचा नवरा तेथे आला. त्याने मोळी विकत घेतली, जेवण केले आणि तो घरी गेला. थोड्याच वेळात ती घरी आली आणी मोळी टाकून म्हणाले, सासूबाई, सासूबाई, लाकडे घ्या आणि मला कोंड्याची भाकरी द्या. करवंटीत पाणी द्या. पण आज घरी पाहुणे कोण आलेत?

बायकोचा आवाज ऐकून नवरा बाहेर आला. जिच्याकडून मोळी विकत घेतली होती ती त्याला दिसली. तिच्या उजव्या हातात त्याने दिलेली अंगठी होती, त्याला खूण पटली. तो बायकोला भेटला व शेजारीच खोली होती, ती त्याने ताब्यात घेतली.

खोली साफसूफ करून त्यांनी सर्व सामान आणले व ते दोघे जण आनंदात तेथे राहून लागले, इतक्यात शुक्रवार आला. तिने नवर्याच्या परवानगीने त्या दिवशी संतोषीमातेच्या व्रताचे उद्यापन केले. जावेच्या मुलांना व सर्व नातेवाइकांना जेवायला बोलविले, जावांनी आपल्या मुलांना शिकवून ठेवले की, काकूजवळ आंबट खायला मागा.

सर्वांची जेवणे झाल्यावर मुले म्हणली, काकू, गोड-गोड खाऊन वीट आला. काहीतरी आंबट खायला दे. त्यावर ती म्हणाली, बाळांनो हे श्रीसंतोषीमातेच्या व्रताचे उद्यापन आहे. आज कोणाला आंबट वस्तु खायला मिळणार नाही.

मुले जेवूण उठली आणि पैसे मागू लागली. तिच्या लक्षात आले नाही. तिने मुलांना पैसे दिले. मुलांनी चिंचा, आवळे आणून खाल्ले. त्यामुळे देवीच्या व्रताचा भंग झाला. देवी कोपली राजाचे दूत आले आणि त्यांनी तिच्या नवर्याला धरून नेले. ती रडत-रडत संतोषीमातेच्या मंदिरात गेली. नमस्कार करून ती म्हणाली, माते, तू काय केलेस? आधी हसवलेस आणि आता का रडवतेस?

देवी म्हणाली, मुली, माझ्या व्रताचा भंग झाला आहे. पण तू मुद्दाम काही केलं नाहीस. आता पुन्हा उद्यापन कर. आता जराही चूक करू नकोस. जा आता. त्याबरोबर ती आनंदाने घरी परतली. रस्त्यात तिचा नवरा तिला भेटला. तो म्हणाला, मी एवढे पैसे मिळवले, त्याबद्दल राजाला कर नको का द्यायला? राजाकडे कर भरूनच मी येत आहे.

ते ऐकून तिला फार आनंद झाला ती दोघे घरी गेली. फिरून शुक्रवार आला. तिने उद्यापनाची तयारी केली. सर्वांना जेवायला बोलाविले. मुले जेवायला आली; पण म्हणाली, काकू, आम्हांला गोड खीर नको. काहीतरी आंबट दे, नाहीतर चाललो आम्ही घरी, आंबटचिंबट काही मिळणार नाही. सरळ जेवायचं तर जेवा. नाहीतर चालायला लागा. आंबट काही मिळणार नाही. तिने सांगितले.

मुले निघून गेली. मग तिने ब्राह्मणांना बोलावले. पोटभर वाढले. दक्षिणेच्या ऐवजी त्यांना एक एक फळ दिले. अशा तर्हेने उद्यापन निर्विघ्नपणे पार पडले. व्रत यथासांग पुरे झाले. श्रीसंतोषीमाता प्रसन्न झाली. लक्ष्मीच्या प्रसादाने तिला एक तेजस्वी मुलगा झाला. ती आपुल्या मुलाला घेऊन रोज देवळात जात असे. एके दिवशी देवीच्या मनात आले की, आपण हिच्या घरी जावे आणि हिची सासू, दीर, जावा कशा आहेत ते पाहावे. मग देवीने अक्राळविक्राळ रूप घेतले. काळाकुट्ट रंग, चपटे नाक, बटबटीत डोळे, मोठे-मोठे रुंद ओठ, तोंडाभोवती माशा घोंघावताहेत, स्थूल शरीर, स्तन खाली लोंबताहेत, कपड्याच्या चिंध्या, आणि सर्व अंगाला दुर्गंधी सुटली आहे, अशा थाटात देवी तिच्या घराच्या देवडीत गेली. तिला पाहून सासूची बोबडीच वळली. ती मोठ्याने ओरडू लागली, धावा, धावा, मुलांनो धावा. कोणी पिशाच्च, डाकीण, शाकीण घरात येते आहे. तिला हाकलून लावा. नाहीतर ती आपणा सर्वांना खाऊन टाकणार.

तो आरडाओरडा ऐकून मुले तिला हाकलायला धावली, पण देवीचे रूप पाहून तीही घाबरली. घरात जाऊन त्यांनी दरवाजे, खिडक्या घट्ट लावून घेतल्या. धाकटी सून हे सर्व खिडकीतून पाहत होती. ती आनंदाने म्हणाली, आज माझी आई माझ्याकडे येत आहे. असे म्हणत असताच तिने अंगावर पीत असलेला आपल्या मुलाला बाजुला ठेवले आणी ती घरभर आनंदाने नाचू लागली. ते पाहून सासू संतापली, तिला वाटेल ते बोलू लागली, शिव्या देऊ लागली, सून म्हाणाली, सासूबाई, घरात येत आहे ती कोणी डाकीण किंवा पिशाच नाही. मी जिचे व्रत करते ती देवी आहे. असे म्हणून तिने सर्व दरवाजे, खिडक्या उघडल्या. श्रीसंतोषीमाता घरात आली. सर्व जण तिच्या पाया पडले. तिची क्षमा मागितली. हे माते, आम्ही सर्व मूर्ख आहोत. अज्ञानी आहो, पापी आहोत. तुझे व्रत कसे करावे हे आम्हांला समजत नाही. तुझ्या व्रताचा आमच्याकडून जाणूनबुजून भंग झाला. आम्ही तुझा फार मोठा अपराध केला. माते, आम्हांला क्षमा कर. आमच्यावर दया कर. याप्रमाणे सर्वांनी प्रार्थना केली. श्रीसंतोषीमाता प्रसन्न झाली. तिने सर्वांना आशीर्वाद दिले आणि ती अंतर्धान पावली. ज्याप्रमाणे त्या सुनेला श्रीसंतोषीमातेचे वरदान मिळाले तसे वरदान ही कहाणी ऐकणारालाही मिळो.

# जेईएस महाविद्यालयात राष्ट्रीय छात्रसेना दिन उत्साहात



**जालना । प्रतिनिधी -** कामात्ते काहुराहे न्यूझीलंड येथील आदिवासी लोकांचे न्याय हक्कासाठी लढण्याचं प्रेरणादायी क्रांती गीत आहे , मला मृत्यूचा भय नाही ,मी माझ्या समाजा कल्याणासाठी लढतच राहील, पुढे हेच गीत न्यूझीलंडच्या आंतरराष्ट्रीय फुटबॉल टीमचे प्रेरणादायी गीत झाले असून जगभर याचा आज डंका वाजत आहे. असे प्रतिपादन जे ई एस महाविद्यालय जालना येथे आयोजित राष्ट्रीय छात्रसेना दिनाच्या कार्यक्रमात प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री यांनी केले.

जेईएस महाविद्यालय जालना येथे राष्ट्रीय छात्र सेना दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी जेईएस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री होते ,व्यासपीठावर राष्ट्रीय छात्र सेनेचे कॅप्टन फुलचंद मोहिते कॅप्टन मोनिका काळे, राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ राजेंद्र सोनवणे तसेच विविध शाळेतील जालना जिल्ह्यातील राष्ट्रीय छात्र सेनेचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. अग्निहोत्री म्हणाले की, राष्ट्रीय छात्र सेना म्हणजे एकता आणि अनुशासन प्रतीक असून, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये आपण देशासाठी लढू शकतो, ही राष्ट्रीय भावना विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करते, हा कॅडेट इतरांपेक्षा वेगळा असतो. देशासाठी काहीतरी करण्याची तळमळ त्याच्यामध्ये असते. पुढे हेच विद्यार्थी सैन्य दलात वेगवेगळ्या तुकड्यांचे नेतृत्व करतात आणि देशाला अभिमानास्पद गौरव प्राप्त करून देतात. यावेळी त्यांनी न्युझीलँड मधील आदिवासी जमातीचे क्रांतीचे गीतकामात्ये काहुराहे गीत गाऊन राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांमध्ये उत्साह व प्रेरणा निर्माण केली, हे गीत पुढे न्युझीलँडच्या फुटबॉल टीमचे गीत कसे झाले हेही सांगितले. देशासाठी लढणाऱ्या सैनिकाला कधीच मृत्यूचे भय नसते, तो देशासाठी सदैव लढतच असतो, हा आदर्श युवकांनी घ्यावा, असेही डॉ. अग्निहोत्री यांनी सांगितले.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे,राष्ट्रीय छात्र सेनेचे अधिकारी, राष्ट्रीय हिंदी विद्यालयाचे श्री. राजू केंद्रे, एम एस जैन मराठी विद्यालयाच्या श्रीमती इंदानी, व श्री अमोल मोहिते, पार्थ सैनिकी शाळेचे श्री.वाघुंडे, जेईएस महाविद्यालयाच्या महिला बटालियनच्या कॅप्टन मोनिका काळे,राष्ट्रीय छात्र सेना युनिट छत्रपती संभाजीनगरचे हवालदार श्री.प्रशांतकुमार, तसेच जिल्ह्यातील विविध शाळा व महाविद्यालयातील छात्र सेनेचे कॅडेटस् मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सीटीएमके विद्यालयाचे श्री पुष्कर सावंत यांनी, तर उपस्थितांचे आभार जेईएस महाविद्यालयाचे कॅप्टन डॉ.फुलचंद मोहिते यांनी व्यक्त केले.

# ‘तुमच्यावर गर्व आहे बाबा’

## मुलगा श्रीकांत शिंदेंची एकनाथ शिंदेंसाठी एक्स वर पोस्ट

**मुंबई -** वैयक्तिक महत्त्वाकांक्षा बाजूला ठेवून ‘युती धर्म’ पाळण्याचे उदाहरण घालून देणारे वडील एकनाथ शिंदे यांचा मला अभिमान असल्याचे शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांनी म्हटले आहे. ६0 वर्षीय एकनाथ शिंदे सध्या महाराष्ट्राचे हंगामी मुख्यमंत्री आहे. खासदार श्रीकांत शिंदे यांनी बुधवारी रात्री सोशल मीडिया प्लॅटफॉर्म द वर एका पोस्टमध्ये म्हटले की, त्यांच्या वडिलांचे महाराष्ट्रातील लोकांशी अतूट नाते आहे. समाजातील प्रत्येक घटकासाठी अहोरात्र कष्ट घेतल्याचे शिवसेना नेते म्हणाले.

मला माझे बाबा आणि आमचे शिवसेना मुख्यनेते मा.ना.श्री.एकनाथजी शिंदे साहेब यांचा खूप अभिमान वाटतो. त्यांची महाराष्ट्र आणि येथील जनतेशी असलेली अतूट बांधिलकी अतुलनीय आहे. त्यांनी अहोरात्र अथक परिश्रम केले. समाजातील प्रत्येक घटकाची निस्वार्थ सेवा करून त्यांचे प्रेम, विश्वास आणि प्रशंसा

मिळालेल्या माहितीनुसार शिवसेना हा भाजप आणि राष्ट्रवादीचा (अजित गट) मित्रपक्ष आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या महाराष्ट्राच्या पुढील मुख्यमंत्र्याच्या नावाच्या निर्णयाला शिवसेना पाठिंबा देईल, असे एकनाथ शिंदे यांनी बुधवारी जाहीर केले. काळजीवाहू मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे की त्यांनी पंतप्रधान मोदी आणि केंद्रीय मंत्री शहा यांच्याशी बोलले आहे आणि त्यांना आश्वासन दिले आहे की राज्यात नवीन सरकार स्थापनेत त्यांच्या बाजूने कोणताही अडथळा येणार नाही.

तसेच श्रीकांत शिंदे म्हणाले, मला माझे वडील आणि शिवसेनाप्रमुखांचा अभिमान आहे. त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्यावर विश्वास ठेवला आणि आपल्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षा बाजूला ठेवल्या आणि युती धर्माचे (उत्तम) उदाहरण ठेवले.'' ते म्हणाले की त्यांचे वडील ''सामान्य माणूस'' म्हणून काम करत होते आणि येथे त्यांच्या दारी मुख्यमंत्र्यांचे शासकीय निवासस्थान 'वर्षा' जनतेसाठी खुले करण्यात आले. तसेच कल्याणचे खासदार श्रीकांत शिंदे म्हणाले की, सत्ता सर्वांना आकर्षित करते, असा समज आहे, पण एकनाथ शिंदे याला अपवाद आहे. त्यांच्यासाठी, देश आणि तेथील लोकांची सेवा सर्वोपरि आहे आणि त्यांचा वारसा भावी पिढ्यांना प्रेरणा देईल.

# अर्थमंत्र्यांचे पती परकला प्रभाकर यांचे मतांच्या टक्केवारीवर बोट

**नवी दिल्ली -** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे निकाल स्पष्ट होताच त्याचं विश्लेषण सुरू झालं. सत्ताधारी वर्गाकडून हा मतदारांचा स्पष्ट कौल असल्याचं सांगितलं जात असताना विरोधकांकडून मात्र ईव्हीएम घोटाळ्याचा आरोप केला जात आहे. त्यात आता केंद्रीय अर्थमंत्री व भाजपाच्या एक प्रभावी नेत्या निर्मला सीतारमण यांचे पती व अर्थतज्ज्ञ परकला प्रभाकर यांचा समावेश झाला असून त्यांनी मतांच्या टक्केवारीचं गणितच आपल्या दाव्याच्या पुष्टीसाठी मांडलं आहे. त्यानुसार मतदानाच्या दिवशी व मतमोजणीच्या आधीही मतांच्या टक्केवारीत झालेल्या वाढीवर त्यांनी बोट ठेवलं आहे.

परकला प्रभाकर यांनी द वायरला दिलेल्या मुलाखतीमध्ये मतदानाच्या टक्केवारीच्या याच मुद्द्यावर सविस्तर भाष्य केलं आहे. प्रसिद्ध मुलाखतकार करण थापर यांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणूक निकालांबाबत त्यांना विचारणा केली असता त्यावर परकला प्रभाकर यांनी परखड भूमिका मांडली.

मतदानाच्या दिवशी संध्याकाळी ५ वाजेपर्यंत महाराष्ट्रात मतदानाची टक्केवारी ५८.२२ टक्के होती. ही जवळपास ५ कोटी ६४ लाख ८८ हजार 0२४ मतं होतात. त्या दिवशी रात्री ११.३0 वाजेपर्यंत मतदानाची टक्केवारी थेट ६५.0२ टक्क्यांवर पोहोचली. हा आकडा जवळपास ६ कोटी ३0 लाख ८५ हजार ७३२ इतका आहे. त्यामुळे २0 नोव्हेंबरला संध्याकाळी ५ ते रात्री ११.३0 यादरम्यान मतांच्या एकूण संख्येत तब्बल ६५ लाख ९७ हजार ७0८ मतांची वाढ झाली. एवढंच नाही, तर प्रत्यक्ष मतमोजणी सुरू होण्याच्या आधी एकूण मतांमध्ये ९ लाख ९९ हजार ३५९ मतांची भर पडल्याचं सांगण्यात आलं, असं परकला प्रभाकर म्हणाले.

त्यामुळे एकंदरीतच २0 तारखेला संध्याकाळी पाच वाजेपासून रात्री ११.३0 पर्यंत आणि मतमोजणीच्या जवळपास १२ तास आधी अशी सगळी मिळून एकूण मतसंख्येत ७५ लाख ९७ हजार 0६७ इतकी वाढ झाली. तुम्ही आजपर्यंत झालेल्या निवडणुकांची माहिती घेतली, तर असं कधीच झालेलं नाही की निवडणूक आयोगानं ५ वाजता जुजबी आकडा दिला आणि काही तासांनी अंतिम मतदानाची आकडेवारी दिली, असा दावा प्रभाकर यांनी केला आहे.

दरम्यान, शेवटच्या काही वेळात वाढलेल्या मतांच्या आकडेवारीसाठी संध्याकाळी ६ वाजेच्या आत (मतदानाची मुदत) रांगेत उभे राहिलेल्या मतदारांना नंतर मतदान करण्याची मुभा देण्यात आली म्हणून आकडा वाढल्याचा दावा केला जात आहे. पण त्यावरही परकला प्रभाकर यांनी आक्षेप घेतला आहे.

निवडणुकांचा इतिहास पाहिला तर निवडणूक आयोगानं दिलेली मतदानाच्या प्रमाणाची प्राथमिक आकडेवारी आणि अंतिम आकडेवारी यात १ टक्क्यांपेक्षा जास्त फरक कधी झालेला नाही. पण यंदा महाराष्ट्राच्या निकालांमध्ये आपल्याला या दोन आकडेवारींमध्ये तब्बल ७.८३ टक्क्यांचा फरक दिसतोय. मतांची संख्याही तब्बल ७६ लाखांनी वाढली आहे, असा मुद्दा परकला प्रभाकर यांनी यावेळी उपस्थित केला.

# मराठा आरक्षण कसं टिकवणार? महायुतीपुढे प्रश्न?

**मुंबई -** राज्यात आता महायुतीचे सरकार स्थापन होणार आणि भाजपकडे मुख्यमंत्रिपद जाणार हे जवळपास निश्चित झालं आहे. भाजपमधून देवेंद्र फडणवीसांनाच मुख्यमंत्रिपदाची संधी मिळणार हीदेखील खात्रीलायक माहिती आहे. नव्या सरकारसमोर रोजगार निर्मिती, राज्याचा आर्थिक गाडा सुरळीत आणणे यासह अनेक आव्हानं असणार आहेत. राज्यापुढील सामाजिक आव्हानांपैकी सर्वात मोठं आव्हान असेल ते म्हणजे मराठा आरक्षण टिकवणार कसं? एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना दिलेलं १0 टक्के आरक्षण टिकवण्यासाठी नव्या सरकारला आता प्रयत्न करावे लागणार आहेत. कारण या आधीही मराठा आरक्षणाला आव्हान देण्यात आलं होतं आणि न्यायालयाने तो आदेश रद्द केला होता.

महायुतीच्या नव्या सरकारची सर्वाधिक कसोटी लागणार आहे ती मराठा आरक्षण टिकवण्यासाठी. कारण फेब्रुवारी २0२४ मध्ये डएइउ अंतर्गत मराठा समाजाला राज्य सरकारनं १0 टक्के आरक्षण दिलं. त्यानंतर लगेचच म्हणजे पाच मार्चपासून या आरक्षणाविरोधात मुंबई उच्च न्यायालयात अनेक याचिका दाखल करण्यात आल्या. म्हणूनच १0 टक्के आरक्षण न्यायालयात टिकवणं हे नव्या सरकारसमोर नवं चॅलेंज असणार आहे.

दिनांक २९ ऑगस्ट २0२३... स्थळ अंतरवाली सराटी. इथं मनोज जरांगे हे मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी उपोषणाला बसले. उपोषणाच्या तिसऱ्याच दिवशी म्हणजे ३१ ऑगस्टला इथं एक लाठीचार्जची घटना घडते आणि त्याचे पडसाद राज्यभरात उमटतात.

त्यानंतर १ सप्टेंबरपासून सुरु झालेली ही चळवळ आजही सुरु आहे. त्याच चळवळीतून मनोज जरांगे पाटील नावाचा एक मराठा नेता उदयास आला. तो मराठा तरुणांच्या गळ्यातला ताईत बनला. त्यानंतर मनोज जरांगे यांनी राज्यभर आंदोलनाचं मोहोळ उठवलं. सर्व मराठे हे कुणबी असून त्यांना सरसकट ओबीसी आरक्षण द्या अशी मागणी त्यांनी केली आणि त्यांना मोठा पाठिंबा मिळाला. जिल्ह्याजिल्ह्यांत सुरू झालेलं हे आंदोलन मुंबईकडे वळलं.

मनोज जरांगे यांनी आंदोलकांना घेऊन मुंबईची वाट धरली. त्यांना पदोपदी मोठा पाठिंबा मिळत गेला. लाखो मराठ्यांचं हे वादळ मुंबईत धडकण्यापूर्वीच शिंदे यांच्या सरकारने त्याला प्रतिसाद दिला आणि जरांगेंच्या सर्व मागण्या मान्य केल्याचं जाहीर केलं.

त्यानंतर राज्य सरकारने फेब्रुवारी २0२४ मध्ये डएइउ अंतर्गत मराठा समाजाला राज्य सरकारनं १0 टक्के आरक्षण जाहीर केलं. पण त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचा मनोज जरांगे यांनी आरोप केला. या सगळ्याचा राग त्यांनी देवेंद्र फडणवीसांवर काढला. मराठा आंदोलनात गेल्या वर्षभरात काय काय झालं ते महाराष्ट्राला माहितीय.

सगळ्यात महत्वाचं म्हणजे मराठा आंदोलनानं राज्याच्या राजकारणावर काय काय परिणाम झालेत. हे आपण लोकसभा निवडणुकीत प्रत्यक्षच पाहिलं आणि मनोज जरांगे यांचा देवेंद्र फडणवीसांवरचा रागही साऱ्या महाराष्ट्रानं पाहिलाय. त्यामुळं राज्यात देवेंद्र फडणवीस पुन्हा मुख्यमंत्री झाले तर काय काय होऊ शकतं याकडेही महाराष्ट्राचं लक्ष लागलंय.

# संविधान उद्देशिकेचे सामुहीक वाचन

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हाधिकारी कार्यालयात २६ नोव्हेंबर संविधान दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहीक वाचन केले. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध विभागाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.



## उपमुख्यमंत्रीनंतर मुख्यमंत्री गेल्या ४६ वर्षांत ९ दिग्गज अपयशी

# ४६ वर्षांची परंपरा देवेंद्र फडणवीस मोडणार कि कायम राहणार?

**नवी दिल्ली** - राज्यात मुख्यमंत्रिपदाबाबत सस्पेन्स कायम असून हा तिढा सुटावा यासाठी दिल्लीपर्यंत खलबतं सुरू आहेत. एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रिपदाची दावेदारी मागे घेतल्यानंतर या खुर्चीवर कोण बसणार हे अजूनही गुलदस्त्यात आहे. भाजपमधून देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्रिपदाचे प्रमुख दावेदार मानले जात आहेत, मात्र महाराष्ट्राच्या राजकारणात एक मिथक आहे, ते म्हणजे उपमुख्यमंत्री कधीही मुख्यमंत्री बनू शकले नाहीत. गेल्या ४६ वर्षांत महाराष्ट्रात ९ उपमुख्यमंत्र्यांना संधी मिळाली, पण एकालाही मुख्यमंत्रिपदापर्यंत पोहोचता आलं नाही.

१९७८ मध्ये वसंतदादा पाटील मुख्यमंत्री बनले, तर नासिक राव त्रिपुडे यांना उपमुख्यमंत्रिपद देण्यात आलं होतं. त्रिपुडे भंडारा विधानसभा मतदारसंघाचं प्रतिनिधित्व करीत होते, पण केवळ ३ महिनेच या पदावर राहू शकले. शरद पवार यांच्या सरकारनंतर त्रिपुडे यांना पदाचा राजीनामा द्यावा लागला आणि ते काँग्रेसच्या संघटनात्मक राजकारणात सक्रिय झाले. १९८३ मध्ये त्रिपुडे यांच्या मुख्यमंत्री होण्याच्या चर्चाही होत्या, पण वसंतदादा पाटील असेपर्यंत त्यांना मुख्यमंत्री बनता आलं नाही. मुख्य राजकीय प्रवाहात त्यांना कधीही येता आलं नाही.

शरद पवार यांच्या सरकारमध्ये सुंदरराव सुंदरराव सोळंखे यांना उपमुख्यमंत्रीपद देण्यात आलं होतं. ते एक वर्षाहून अधिक काळ या पदावर होते, पण पवार यांच्या सरकार पडलं आणि सोळंखे यांना पद सोडावं लागलं. ते परली आणि बीडमधील मोठे नेते होते, पण पवार यांच्या सरकारनंतर ते राजकारणात पुन्हा स्थान मिळवू शकले नाहीत. २0१४ मध्ये त्यांचं निधन झालं.

१९८३ मध्ये वसंतदादा पाटलांनी रामराव आदिक यांना उपमुख्यमंत्रिपद दिले. आदिक मुंबईतील काँग्रेसचे मोठे नेते होते. १९८५ मध्येही ते मुख्यमंत्रिपदाचे दावेदार मानले जात होते. पण तरीही त्यांना मुख्यमंत्रिपदाच्या खुर्चीपर्यंत पोहोचता आलं नाही.

राज्यात १९९५ मध्ये शिवसेना आणि भाजप युतीचं सरकार बनलं, ज्यात भाजपचे दिग्गज नेते गोपीनाथ मुंडे उपमुख्यमंत्री बनले. ५ वर्षे त्यांनी हे पद भूषवलं, पण त्यानंतर ते केंद्रातील राजकारणात सक्रिय झाले. तर १९९९ मध्ये छगन भुजबळ यांना शरद पवार यांनी उपमुख्यमंत्री बनवले. पण भुजबळ यांना देखील मुख्यमंत्रिपदार्यंत पोहोचता आलं नाही.

अजित पवार २0१0 पासून वेगवेगळ्या सरकारांमध्ये उपमुख्यमंत्री म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी अनेक वेळा मुख्यमंत्री होण्याची इच्छा व्यक्त केली, पण बदलती राजकीय समीकरणं आणि जनाधारामुळे ते आजतागायत मुख्यमंत्री होऊ शकले नाहीत.

महाराष्ट्राच्या राजकारणात उपमुख्यमंत्री पद भूषवणाऱ्या नेत्याला कधीही मुख्यमंत्री बनता आलं नाही हा इतिहास आहे. आता महायुती सरकारमध्ये देवेंद्र फडणवीस गेली अडीच वर्ष उपमुख्यमंत्री होते. ते प्रचार आणि सभांमध्ये मी पुन्हा येईन असं सांगत आलं आहेत. मुख्यमंत्रिपद कोणत्याही क्षणी जाहीर होऊ शकतं, पण गेल्या २३ तारखेपासून अजातागायत देवेंद्र फडणीस यांचं नाव मुख्यमंत्री म्हणून जाहीर करण्यात आलेलं नाही. त्यामुळे आता उपमुख्यमंत्री मुख्यमंत्री बनू शकत नाही ही परंपरा देवेंद्र फडणवीस मोडणार की कायम राहणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.



## पान १ वरुन

### सेवानिवृत्त पोलीसाची ...

केल्याचे प्रथमदर्शनी निष्पन्न झाले आहे. त्याच्या पश्चात आई, पत्नी, विवाहीत मुलगी व मुलगा असा परिवार आहे.

ही घटना बुधवारी रात्री ११.३0 वाजण्याच्या सुमारास घडली असुन गुरुवारी सकाळी ७.३0 वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली आहे. संशयीत आरोपी सिद्धीविनायक पेडणेकर याला कणकवली पोलीसांनी अटक केली आहे. मात्र खुनाचे कारण अद्यापही स्पष्ट झाले नाही.

मुंबई पोलीस दलात सेवा बजावुन गेल्या दोन महिन्यापुर्वीच स्वेच्छानिवृत्ती सहाय्यक पोलीस उपनिरिक्षक विनोद मधूकर आचरेकर (वय ५५,रा. कोळोशी वरचीवाडी) यांनी घेतली होती. त्यानंतर ते मुंबई येथुन गावी अधुन-मधुन येत असायचे त्याप्रमाणे गेल्या दोन दिवसापुर्वी विनोद आचरेकर कोळोशी-वरचीवाडी येथील घरी आले होते. बुधवारी रात्री एकत्र जेवण करण्यासाठी त्यांच्या समवेत संशयीत आरोपी सिध्दीविनायक पेडणेकर, (वय २४ रा.कोळोशी वरचीवाडी) हा होता. संशयित आरोपी हा मयत विनोद आचरेकर याच्या मामेभावांचा मुलगा असून त्याची त्यांच्याकडे ये-जा होती. त्यामुळे तो रात्री एकत्र जेवण करण्यासाठी आचरेकर यांच्या घरी होता. त्या दोघांमध्ये डायनिंग टेबलवर जेवण केल्याचे दोन ताट दिसून येत आहेत. त्या टेबलवर दोन काचेची ग्लास दिसत असुन बाजुला तसेच एक दारुची बॉटल, पिशवी ,रक्ताने माखलेली बेडशीट पडलेली होती. तर विनोद आचरेकर हे रक्ताच्या थारोळ्यात कोसळलेल्या अवस्थेत होते. या खुनाप्रकरणी संशयीत आरोपी सिद्धीविनायक संजय पेडणेकर याच्या विरोधात कणकवली पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहीता कलम १0३(१) नुसार खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### निवडणुकीत मतदारांचा ...

मतदान झालेले आहे. त्याचे फोटो आणि व्हिडीओ आम्हाला निवडणूक आयोगाने दिले पाहिजे. हे मतदान कोणत्या केंद्रावर झालं? साडेसात टक्क्यांनी मतदान कसं वाढलं?, असे प्रश्न नाना पटोले यांनी आयोगाला विचारले आहेत.

# रोटरी क्लब जालना ईलाइटतर्फे शव शीत पेटी सेवेचे लोकार्पण

**जालना । प्रतिनिधी** -- रोटरी क्लब ऑफ जालना ईलाइटच्यावतीने प्रांतपाल डॉ. सुरेश साबू यांच्या हस्ते आणि सहाय्यक प्रांतपाल किशोर देशपांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत 'शव शीत पेटी' सेवेचे लोकार्पण करण्यात आले.

प्रांतपाल डॉ. सुरेश साबू यांच्या रोटरी इलाईटला अधिकृत भेटीनिमित्त हॉटेल सफ्रॉनमध्ये आयोजित बैठक पार पडली. याप्रसंगी फस्टलेडी निर्मला साबु, स्मिता चेचाणी, डॉ. नितीन खंडेलवाल, डॉ. सुमित्रा गादिया, विवेक मणियार, गणेश बाले, विजयालक्ष्मी बाले, मुकेश अग्रवाल, श्रीमती लधानी, इंटरॅक्ट अध्यक्ष कु. रोहिणी ठाकूर, सचिव सोहा नजीब व कॉर्डिनेटर शिक्षक सौ. मनीषा पांडे व सर्व पदाधिकारी-सदस्यांची उपस्थिती होती. प्रारंभी क्लबचे अध्यक्ष राजेंद्र अग्रवाल यांनी वार्षिक अहवाल सादर केला आणि क्लबने आतापर्यंत राबविलेल्या ४५ विविध प्रकल्पांची माहिती दिली. क्लबची सदस्य संख्या ६ वरून १७ पर्यंत पोहोचली. क्लबने सन २०२३-२४ मध्ये डिस्ट्रिक्ट गव्हर्नर सायटेशन महत्वाचे अवॉर्ड मिळवले असून, प्रांतातील ९५ क्लबमध्ये २३ वे तर जालना महसूल जिल्ह्यात तिसरे स्थान मिळवले आहे. यावर्षी क्लबने स्थापन केलेल्या जालना ईलाइट स्पार्कल इंटरॅक्ट क्लबने जालना शहर व रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ मध्ये नावलौकिक मिळविल्याचे राजेंद्र अग्रवाल यांनी सांगितले.



याप्रसंगी कैलास शिंदे, रवींद्र हुशे, विनोद बरवार, गिरधर लधानी, डॉ. प्रल्हाद उढान, शरद गादिया, सौ. संगीता शरद गालिया, प्रदीप भारजवाल, जितेंद्र गर्ग, सौ. रोशनी प्रल्हाद उढान, रुक्मिणिकांत दीक्षित या ११ जणांनी क्लबचे सदस्यत्व स्वीकारले. डॉ. सुरेश साबू यांनी यावेळी क्लबच्या कार्याचे कौतुक केले आणि उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

मृतदेहावर अंत्यसंस्कार वेळेत होणे आवश्यक असते, पण काही कारणाने अंत्यसंस्काराची वेळ लांबते. अशा वेळी मृतदेह शीतगृहात नेऊन ठेवायची वेळ येते आणि अंत्यसंस्कारासाठी तेथून मृतदेह पुन्हा घरी घेऊन आणावा लागतो, या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी क्लबने 'शव शीत पेटी' सेवा उपलब्ध करून दिली असून, या सेवेची लोकार्पण यावेळी करण्यात आले. ही शव शीत पेटी जनकल्याण रक्तपेढी येथे ठेवण्यात आलेली असून, त्यासाठी ८३८००४९३२८ आणि ९४०४०४२०२८ हे संपर्क क्रमांक देण्यात आले आहेत. शव शीत पेटीसाठी योगदान देणारे कालिका स्टीलचे संचालक तथा ज्येष्ठ रोटरी सदस्य अरुण अग्रवाल आणि देणगीदार राजेंद्र अग्रवाल, अनया अग्रवाल, शरद गादिया, गणेश बाले व उमेश बजाज यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उमेश बजाज यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार अनया अग्रवाल यांनी मानले.

# राष्ट्रीय शालेय बेसबॉल स्पर्धासाठी महाराष्ट्र संघात अमृता सोपान शिंदे हिची निवड



**जालना । प्रतिनिधी -** नुकताच २५ ते २६ नोव्हेंबर या कालावधीत जिल्हा क्रीडा संकुल बारामती, जि पुणे येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय शालेय बेसबॉल स्पर्धा व निवड चाचणीमध्ये छत्रपती संभाजीनगर विभागाची अमृता सोपान शिंदे हिने उत्कृष्ट खेळी करत महाराष्ट्र संघात स्थान पटकाविले आहे.

अमृताने यापूर्वी १४ वर्षे वयोगटात असतांना मध्यप्रदेश येथे मागील २०२३ -२४ मध्ये १७ वर्षे वयोगटात छत्तीसगड येथील राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होऊन उत्कृष्ट खेळी केली होती. या वर्षे ही १९ वर्षे वयोगटात आपले स्थान महाराष्ट्र संघात कायम ठेवले आहे. या यशाबद्दल जिल्हा क्रीडा अधिकारी संजय गाढवे, जालना जिल्हा बेसबॉल असोशियशनचे अध्यक्ष निवृत्ती दिवटे, सचिव एकनाथ सुरुशे, कोषाध्यक्ष प्रमोद खरात व पदाधिकारी यांच्यासह जिजाऊ ज्युनिअर कॉलेज सेलगावचे अध्यक्ष गजानन वाळके,प्राचार्य पवार यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहे.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.